खासगी क्षेत्रातही आता इलेक्ट्रिक बस! >> पान 2

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राज्यात वर्षभर उपक्रम >> पान 3

समृद्धीवर मृत्यूचा सापळा! मेहकरजवळ तिहेरी अपघात; मदतकर्तेही जखमी >> पान 4

सुविचार

नारळाच्या झाडापेक्षा हरभऱ्याच्या झाडावरुन पडलं की, जास्त लागतं.


# दैनिक आपला विदर्भ


apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 242 ■ शनिवार, दि. 11 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


विनम्र अभिवादन



थोर समाजसुधारक आणि महिलांच्या शिक्षणासाठी आग्रही असणारे महात्मा जोतिबा फुले यांची आज २०० वी जयंती.

## युद्ध; महागाई वाढली

**वॉशिंग्टन डीसी :** इराणमध्ये सत्तांतर घडवून आणणे, इराणची अणुबॉम्ब तयार करण्याची आणि आण्विक हल्ला करण्याची क्षमता नष्ट करणे या प्रमुख हेतूने अमेरिकेने इराण विरोधात कारवाई सुरू केली. या कारवाईला २८ फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात झाली. आज १० एप्रिल उजाडला आहे. अद्याप अमेरिकेचा हेतू साध्य झाल्याचे दिसत नाही. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या आकडेवारीनुसार अमेरिका इराण विरूद्धच्या युद्धात दर सेकंदाला दहा हजार ३०० डॉलर खर्च करत आहे. हा खर्च दिवसागणिक वाढत आहे. वाढत्या युद्ध खर्चाचा भार अमेरिकेतील सामान्यांच्या जीवनावर पडत आहे. अमेरिकेतील सामान्यांना महागाईचा जबर फटका बसत आहे.

## शेअर बाजारात तेजी

**मुंबई :** पश्चिम आशियातील युद्धामुळे अमेरिकेत कर्ज महाग झाले आहे. याउलट भारतात रेपो रेट स्थिर आहे. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेविषयीचा गुंतवणूकदारांमधील विश्वास वाढला आहे. याचा भारतीय शेअर बाजाराला फायदा होत असल्याचे दिसत आहे. आठवड्याच्या अखेरीस बंद होताना शेअर बाजारात तेजी दिसली. सेन्सेक्स आणि निफ्टीत घसघशीत वाढ झाली.

## चेंजिंग रूममध्ये कॅमेरा

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील कामशेत परिसरात दुकानांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी घटना समोर आली आहे. एका कपड्यांच्या दुकानातील चेंजिंग रूममध्ये छुप्या पद्धतीने सीसीटीव्ही कॅमेरा लावून महिलेचा व्हिडिओ रेकॉर्ड केल्याप्रकरणी दुकानदाराला पोलिसांनी अटक केली आहे.

## आयफोन पळवला

**नागपूर :** नागपूरातील गजबजलेल्या गणेशपेठ बसस्थानकावर भर गर्दीत एक धक्कादायक चोरीची घटना उघडकीस आली आहे. प्रवाशाच्या खिशातून चोरट्याने अत्यंत चलाखीने iPhone 16 Pro मोबाईल लंपास केल्याने बसस्थानकातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून पोलिसांकडून संशयिताचा शोध सुरू आहे.

## न्या. वर्मा यांचा राजीनामा

**अलाहाबाद :** अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्या. यशवंत वर्मा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. न्या. वर्मा यांनी आपला राजीनामा राष्ट्रपतींकडे पाठवला असल्याची माहिती समोर आली आहे. मार्च २०२५ मध्ये त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जळलेली आढळल्याच्या न्या. वर्मा देशभरात चर्चेचा विषय ठरले होते.

# भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा कार्यान्वित करा : मुख्यमंत्री फडणवीस

### भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी पोर्टलची निर्मिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी : मुंबईमध्ये नोकरी, व्यवसाय निमित्ताने बाहेरून मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. त्यांच्याकरिता मोठ्या प्रमाणावर घरांची आवश्यकता असल्याने भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा उभारून कार्यान्वित करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी नागरिकांच्या सुविधांकरिता पोर्टल विकसित करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईसह अन्य महानगरांमध्ये नोकरी, व्यवसायनिमित्त आलेल्या नागरिकांसाठी परवडणाऱ्या दरात भाडेतत्त्वावरील घरे असली पाहिजेत. मागणीनुसार पुरवठा या तत्त्वावर भाडेतत्त्वाने घरे उपलब्ध होतील, याची काळजी घेण्यात यावी. घरांसाठी मागण्यांसंदर्भातील करारानुसार सर्व कार्यवाही होईल, याबाबतही यंत्रणेने दक्षता घेतली पाहिजे. उपलब्ध असलेल्या भाडेतत्त्वावरील घरांबाबत यंत्रणेने समन्वयाने कार्यवाही केल्यास मालक व भाडेकरू या दोघांनाही अडचण येणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ अंमलबजावणीच्या सक्षमीकरण व सुलभी करणाबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या कायद्याअंतर्गत सक्षम प्राधिकारी म्हणून पोलीस उपायुक्त यांना नियुक्त करावे. पोलीस स्टेशन अथवा पोलिसांचे परिक्षेत्र वाढल्यास त्यानुसार आपोआप सक्षम अधिकारी वाढतील, अशी व्यवस्था करावी. पोलीस उपायुक्तांच्या कामकाज यादीमध्ये सक्षम प्राधिकारी म्हणून काम पाहण्याच्या कामकाजाचा समावेश करण्यासाठी अधिसूचना काढण्याची कार्यवाही करावी. भाडेदर संदर्भातील न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यासाठी १०० विशेष न्यायालये स्थापन करावी. यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करावी.

न्यायालयाच्या परवानगीने भाडेदर संदर्भातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी सायंकाळचे न्यायालय सुरू करावे या न्यायालयांसाठी जागा नसल्यास भाडेतत्त्वावर जागा घेण्यात याव्यात. यामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली निघतील, असा विश्वास यावेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

बैठकीस गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, पोलीस आयुक्त देवेन भारती, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, राधिका रस्तोगी, विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल आदी उपस्थित होते.

# होर्मुझ अद्याप बंदच; केवळ पाच जहाजांची वाहतूक



**तेहरान, वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविरामाच्या घोषणेनंतरही होर्मुझ सामुद्रधुनीमधील जहाज वाहतूक जवळपास ठप्पच राहिली आहे. जगातील तेल आणि एलएनजी पुरवठ्याच्या एक पंचमांश भाग हा सामुद्रधुनीतून होतो. त्यामुळे जागतिक ऊर्जा संकट कायम असल्याचे दिसते.

मंगळवारी जाहीर झालेल्या दोन आठवड्यांच्या युद्धविरामानंतर बुधवारी फक्त ५ जहाजे, गुरुवारी ७ जहाजे अशी एकूण मोजकीच जहाजे या सामुद्रधुनीतून गेली. पूर्वी रोज १२०–१४० जहाजे येथून पार करत असत. सध्या ६०० हून अधिक जहाजे, त्यात ३२५ टँकर खाडीत अडकलेल्या अवस्थेत आहेत. कप्लरच्या विश्र्लेषक अना सुबासिक यांनी सांगितले की, 'काही हालचाल झाली तरी अनुपालन करणारे मालक सावध राहतील. युद्धविराम टिकला तरी दिवसाला १०–१५ जहाजांपेक्षा जास्त सुरक्षित वाहतूक शक्य नाही.'

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर म्हटले, 'इराण तेल जाण्यासाठी फारच खराब काम करत आहे. हे आमच्या करारानुसार नाही.' इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेवर करार पाळण्यात अपयश आल्याचा आरोप केला आणि लेबनॉनमधील हल्ल्यांचा उल्लेख केला.

संयुक्त अरब अमिरातीच्या कंपनीचे सीईओ सुलतान अहमद अल जाबेर यांनी स्पष्ट केले, 'होर्मुझ सामुद्रधुनी खुली नाही. प्रवेश नियंत्रित आणि शर्तींवर आहे. हे स्वातंत्र्य नव्हे, ही जबरदस्ती आहे.'

**भारतावर संभाव्य परिणाम**

भारत आपल्या ८० टक्क्यांहून अधिक कच्च्या तेलाची आयात करतो. होर्मुझमधील अडथळ्यामुळे तेलाच्या किमती वाढल्या आहेत. ब्रेंट क्रूडची किंमत शुक्रवारी सकाळी सुमारे ९६ डॉलर प्रतिबॅरल होती. यामुळे देशांतर्गत पेट्रोल–डिझेल, एलपीजीच्या किमतींवर दबाव वाढू शकतो आणि महागाई वाढण्याची शक्यता आहे. भारतीय नौदलाचे माजी अधिकारी सी. उदय भास्कर यांनी 'अनिश्र्चितता आणि चिंता' असल्याचे सांगितले.

## भाविकांची बोट नदीत उलटली, १० जणांचा मृत्यू

**लखनऊ/वृत्तसंस्था:** उत्तर प्रदेशच्या मथुरा जिल्ह्यात येणाऱ्या वृंदावनमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. यमुना नदीत बोट उलटली आहे. नदीतील पीपा पुलाजवळ भाविकांनी भरलेली एक बोट उलटली. या दुर्घटनेत १० भाविकांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत १४ जणांचा जीव वाचवण्यात यश आलं आहे. अनेक जण आताही बेपत्ता आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि मदत–बचाव करणारी पथकं दुर्घटनास्थळी पोहोचली.

मथुराचे डीएम चंद्र प्रकाश सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, यमुना नदीत सातत्यानं शोध मोहीम सुरु आहे. यासाठी पाणबुड्यांची मदत घेतली जात आहे. त्यांच्याकडून बेपत्ता लोकांचा शोध सुरु आहे. मथुरा जिल्हा प्रशासन आणि वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. ते परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहेत. वृंदावनात बोट उलटल्याच्या घटनेची दखल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घेतली आहे. त्यांनी मृतांना श्रद्धांजली वाहिली आहे.

# अमेरिका – इराण शांती चर्चा बारगळणार?

### युद्धविरामात लेबनॉनचा समावेश करा, अन्यथा बहिष्कार : इराण

**वॉशिंग्टन डी सी :** लेबनॉनमधील हिजबुल्लाह या संघटनेवरील इस्रायलच्या हल्ल्यामुळे युद्धविराम धोक्यात असताना अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हॅन्स इराणबरोबरच्या शांतता चर्चेसाठी पाकिस्तानला रवाना झाले. मात्र लेबनॉनचा युद्धविरामात समावेश न केल्यास चर्चेवर बहिष्कार टाकण्याचा इशारा इराणने दिला आहे. त्यामुळे अमेरिका–इराणची शनिवारपासून इस्लामाबादेत होणारी शांती चर्चा बारगळण्याची शक्यता आहे.



होर्मुझ सामुद्रधुनीवरील अनिश्र्चिततेमुळे युद्धविराम टिकेल की नाही, याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत, त्याचप्रमाणे दीर्घकालीन करार शक्य आहे की नाही, यावरही शंका व्यक्त होत आहे. मात्र व्हॅन्स यांनी इस्लामाबादला (पाकिस्तानची राजधानी) रवाना होण्यापूर्वी आशावादी सूर लावला.

शुक्रवारी तेलाच्या किमती चढ्या होत्या. अमेरिकेत महागाई दरही वाढलेला होता. इराणने प्रत्यक्षात होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्याने एकूणच जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला. त्याला अमेरिकाही अपवाद नव्हती तसेच इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी लेबनॉनमधील इराण समर्थित दहशतवादी गट हिजबुल्लाहवर हल्ले सुरू ठेवण्याचा हेका कायम ठेवला आहे. अध्यक्ष ट्रम्प यांनी त्यांना इस्रायली कारवाया कमी करण्यास सांगितले असूनही ते हा हेका कायम ठेवून आहेत. हे हल्ले नेतान्याहू आणि ट्रम्प यांच्यातील मतभेद उघड करतात. ट्रम्प इराणसोबत करार करून युद्ध संपवण्यास उत्सुक दिसतात. लेबनॉनचा युद्धविरामात समावेश केला नाही तर इस्लामाबाद चर्चांमध्ये सहभागी होणार नाही, असे इराणने जाहीर केले आहे.

बुधवारी झालेल्या इस्रायली हल्ल्यांच्या मालिकेत लेबनॉनमध्ये किमान ३०३ लोक ठार आणि १,१५० जखमी झाले. युरोपीय नेत्यांनी इस्रायलला हल्ले थांबवण्याचे आवाहन केले असून लेबनॉनलाही युद्धविराम चर्चेत समाविष्ट करण्याची मागणी केली आहे.

लेबनॉन वरील हल्ले थांबवा: गोठवलेली मालमत्ता मुक्त करा

लेबनॉनमध्ये पूर्ण शांतता आणि त्यांच्या परदेशी बँकांतील अब्जावधी डॉलर्सची गोठवलेली मालमत्ता मुक्त करण्याशिवाय शनिवारी पाकिस्तानमध्ये होणार्या शांतता चर्चेला सुरुवात होणार नाही. यामुळे अमेरिका–इराण यांच्यात इस्लामाबादेत होणारी चर्चा बारगळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे नुकत्याच झालेल्या दोन आठवड्यांच्या युद्धविरामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकर कालिबाफ यांनी सोशल मीडियावर इशारा दिला की, हे दोन्ही मुद्दे अमेरिकेशी आधीच ठरले होते. याशिवाय चर्चा सुरू होणार नाही.

अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स, हे पाकिस्तानातील चर्चेच्या अमेरिकी प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व करणार आहेत.

# अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणाबाबत १६ व १७ एप्रिलला सुनावणी

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने १६ व १७ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात येणार आहे. यासाठी गठित समितीसमोर आपली भूमिका किंवा मते मांडण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी १५ एप्रिल २०२६ पर्यंत dg-swbarti.in या ई–मेल आयडीवर आपले निवेदन किंवा अर्ज सादर करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात आले आहे.

या संदर्भात, न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने आपल्या शिफारशींसह अहवाल १६ मार्च २०२६ रोजी शासनास सादर केला आहे. या अहवालाच्या पार्श्र्वभूमीवर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पुढील कार्यवाहीसाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या समितीसमोर आपली भूमिका किंवा मते मांडण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी १५ एप्रिल २०२६ पर्यंत dg-swbarti.in या ई–मेल आयडीवर आपले निवेदन किंवा अर्ज सादर करावेत. अर्ज सादर करताना संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

सुनावणीचे ठिकाण, वेळ व इतर तपशील संबंधितांना दूरध्वनीद्वारे कळविण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.




# 'ऑपरेशन टायगर'सारखी काही बैठक झालीच नाही, शिंदेंनीच टाकला सर्व चर्चांवर पडदा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** शुक्रवारी सकाळपासून मुंबईसह महाराष्ट्रभरात चर्चा होती ती कथित 'ऑपरेशन टायगर'ची. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या जवळपास ८ खासदारांची खुद्द शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्याशी बैठक झाली असून ते लवकरच शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या वृत्ताची जोरदार चर्चा राजकीय वतुर्ळात पाहायला मिळाली. यावरून संबंधित खासदारांनी अशा कोणत्याही बैठकीला आम्ही उपस्थित नव्हतो, असं स्पष्टीकरणदेखील दिलं. मात्र, तरीदेखील या वृत्तावरून तर्क–वितर्कांना उधाण येतच राहिलं. अखेर खुद्द एकनाथ शिंदेंनीच या प्रकरणावर पडदा टाकणारा खुलासा केला असून त्यासंदर्भातली पोस्ट शिवसेनेच्या अधिकृत एक्स हँडलवर शेअर करण्यात आली आहे.

नेमकं काय होतं वृत्त?

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील ८ खासदारांनी बुधवारी ठाण्यात उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याचं वृत्त एका वृत्तपत्राने प्रकाशित केलं. मुंबईसह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील हे खासदार असून त्यांच्या नावांचादेखील उल्लेख करण्यात आला होता. यावरून महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात मोठी चर्चा सुरू झाली. यानंतर उल्लेख करण्यात आलेल्या खासदारांनी विविध वृत्तवाहिन्यांवर दिलेल्या प्रतिक्रियांमध्ये हे वृत्त पूर्णपणे निराधार असून अशी कोणतीही बैठक झाली नसल्याची भूमिका मांडली.

दरम्यान, यासंदर्भात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे प्रवक्ते व राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केलं आहे. ''ऑपरेशन एकदाच केलं जातं. वारंवार एखाद्या शरीराचं ऑपरेशन केल्याचा दावा केला जातो, तेव्हा ते मृतदेहाचं ऑपरेशन करत असतात. असं बोलणाऱ्यांच्या पक्षाचा देवेंद्र फडणवीसांनी मृतदेह केला आहे. देवेंद्र फडणवीस एकनाथ शिंदेंच्या पक्षाचं ऑपरेशन करत आहेत. शिवसेनेचे ९ खासदार एकजुटीनं एकत्र आहेत'', असं ते म्हणाले.

काय आहे एकनाथ शिंदेंचं नेमकं स्पष्टीकरण?



शिवसेनेकडून शेअर करण्यात आलेल्या पोस्टमध्ये एकनाथ शिंदेंची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. त्यात एकनाथ शिंदेंनी हे वृत्त म्हणजे केवळ अफवा असून त्यात कोणतंही तथ्य नसल्याचं स्पष्ट केलं आहे. ''उबाठाच्या खासदारांसोबत झालेल्या कथित बैठकीचे वृत्त पूर्णपणे निराधार, खोडसाळ आणि गैरसमज निर्माण करणारे आहे. अशी कोणतीही बैठक झालेली नाही. उबाठाचे खासदार फुटून शिवसेनेत येणार असल्याच्या बातम्या गेल्या एक–दीड वर्षांपासून पसरवल्या जात आहेत. परंतु, त्यात कोणतेही तथ्य नाही. ती केवळ अफवा आहे. त्यामुळे सनसनाटी निर्माण करण्यासाठी अशा पद्धतीच्या बातम्या देणे माध्यमांनी टाळले पाहिजे'', अशा शब्दांत एकनाथ शिंदेंनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.

## केरळचे जेष्ठ बजेट...

भारतात प्रथमच ज्येष्ठ लोकांसाठी म्हणजेच साठ वर्षांची वयोमर्यादा पार केलेल्या वृद्धांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प सादर केला. २९ जानेवारी रोजी सादर केलेला केरळचा अर्थसंकल्प अत्यंत मार्गदर्शक व देशाच्या पातळीवर आदर्शवत ठरणारा आहे. इतर राज्यांनीही याचे अनुकरण करायला हरकत नाही. लोकसंख्येमध्ये आपण युवकांची संख्या अधिक असल्याने युवकांचा देश किंवा लोकसंख्येचा लाभांश (डेमोग्राफीक डिव्हीडंड) असे आपण म्हणत होतो. आता भारतीय लोकसंख्या स्थित्यंतराच्या पुढच्या टप्प्यात म्हणजेच वृद्धांची लोकसंख्या वेगाने वाढण्याच्या टप्प्यात जात आहे. हे परिवर्तन अनेक प्रकारच्या समस्या निर्माण करणारे असून त्यासाठी केरळने ज्याप्रमाणे वृद्ध लोकांच्या कल्याणाकरिता तरतुदी केल्या त्या इतर राज्यांमध्ये देखील स्वीकारून राष्ट्रीय स्तरावर वृद्धांच्या धोरणात महत्त्वपूर्ण बदल करणे आवश्यक आहे. हे आव्हान अनेक आयामांचे असून केवळ आर्थिक बाजू महत्त्वाची नसून त्याच्या इतर बाजूदेखील तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. ही केरळ स्टोरी त्यामुळे अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. सध्याच्या लोकसंख्येचा एकूण वाढीचा दर जरी घटला असला तरी त्यामध्ये वृद्ध लोकांची संख्या अधिक वेगाने वाढत आहे. यामध्ये राज्यस्तरीय फरक असून सर्वाधिक वेग हा केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि पंजाब या ठिकाणी आहे. तो साधारणपणे १७ ते २२ टक्के या मर्यादेत असून बिहारमध्ये सर्वाधिक कमी म्हणजे ११ टक्के तर उत्तर प्रदेशमध्ये तो १२ टक्के आहे. याचाच अर्थ बिहार आणि उत्तर प्रदेश ही आता लोकसंख्येच्या दृष्टीने तरुण राज्ये आहेत. महाराष्ट्राच्या बाबतीत ज्येष्ठ लोकांच्या लोकसंख्येच्या वाढीचा दर हा ११ टक्के असून सध्या त्यांची संख्या दीड कोटी इतकी आहे. केरळच्या ज्येष्ठांकरिता असणाऱ्या पहिल्या अंदाजपत्रकात पुढील महत्त्वाच्या तरतुदी आहेत, केरळ हे राज्य ज्येष्ठ लोकांच्या सर्वाधिक वाढीचे राज्य असून सध्या १९ टक्के वृद्ध तेथे असून हे प्रमाण २०३० पर्यंत राज्याच्या लोकसंख्येच्या ३० टक्केपर्यंत जाण्याची शक्यता आहे. सर्वाधिक साक्षर असणारे आणि रोजगारासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करणारे राज्य आता आपल्या वृद्ध लोकांचा सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा हक्क देण्यासाठी कटिबद्ध दिसते. यामध्ये ४७ कोटी रुपयांची तरतूद एकूण १९ टक्के लोकसंख्येसाठी तेवढ्याच प्रमाणात म्हणजे १० टक्के तरतूद करते. यामध्ये सामाजिक कल्याण निवृत्ती वेतन म्हणजेच त्यांना कुठल्याही प्रकारच्या निवृत्तीवेतनाचा आधार नाही अशा लोकांच्याकरिता १६०० रुपये वरून दोन हजार रुपयेपर्यंत मासिक निवृत्ती वेतन वाढवले आहे, यांची संख्या ६२ लाख इतकी आहे. ज्येष्ठांचे लसीकरण करण्याकरिता ५० कोटींची तरतूद केली असून वयोमित्र या योजनेत प्रत्येकाच्या घरापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचवली जाते. ज्येष्ठ लोकांच्या सेवा करणाऱ्या स्वयंसेवी संस्था याकरिता दहा कोटींची तरतूद असून फोन केल्यानंतर ही सुविधा त्यांना उपलब्ध होते. उत्तम दर्जाच्या निवासव्यवस्था ज्येष्ठांकरिता करता याव्यात यासाठी ३० कोटीची तरतूद केली आहे तसेच जे युवक ज्येष्ठांना सेवा देतात त्यांचे सेवा वेतन ६०० रुपयांवरून एक हजार रुपये करण्यात आले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्येष्ठांकरिता स्वतंत्र आयोग नियुक्त करण्यात आला आहे. यात भविष्यकाळात ज्येष्ठ लोकांना कोणत्या प्रकारच्या सुविधा द्याव्या लागतील यासाठी मार्गदर्शक तरतुदी सूचना केल्या जाणार आहेत. एकूण वृद्धांच्या लोकसंख्येत महिला वृद्धांचे प्रमाण लक्षणीय असल्याने त्यांना अधिक प्रमाणात सुविधा देण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात केला आहे. भविष्यकाळात सर्वच राज्यांमध्ये ज्येष्ठांची लोकसंख्या वाढणारी असेल. २०३६ पर्यंत ज्येष्ठांची लोकसंख्या दुप्पट होणार आहे. याचाच अर्थ आगामी दहा वर्षात ज्येष्ठांची संख्या १०० टक्क्यांनी वाढणार आहे. ज्येष्ठ लोक हे लोकसंख्येचा भार नसून अशी लोकसंख्या ही देशाची मानवी भांडवल असते आणि त्यामुळे त्याच्या कल्याणासाठी मदतीसाठी तरतुदी करणे कर्तव्याचा भाग आहे. भारतीय लोकसंख्येचा आकार प्रचंड मोठा असून अजूनही वृद्धाप काळासाठी पुरेशा प्रमाणात आर्थिक सोय असणाऱ्यांची संख्या १८ टक्केपेक्षा अधिक नाही. याचाच अर्थ ८२ टक्के लोकसंख्या ही अद्यापि पारंपरिक परावलंबन म्हणजेच मुलगा व मुलगी यांच्याकडून देखभालीची सांभाळण्याची अपेक्षा ठेवणारे आहेत. सध्या उत्पन्नाचे अस्थिर स्वरुप, रोजगाराचे घटते स्वरुप यातून वृद्ध लोकांच्या आर्थिक भाराचा प्रश्न निर्माण होतो. या संदर्भात अटल पेन्शन तसेच नवी एकात्मिक पेन्शन यासारख्या योजना महत्त्वाच्या असल्या तरी त्या ज्येष्ठांपर्यंत पोहोचणे हे आव्हानात्मक काम आहे. ज्येष्ठांना केवळ उत्पन्न सुरक्षितता एवढीच महत्त्वाची नसून सोबत आरोग्याचे प्रश्नही महत्त्वाचे असतात. उत्पन्नाच्या अपूर्णतेमुळे ६० वर्षानंतरही काम करणारे चंदेरी अर्थव्यवस्था सिल्व्हर इकॉनॉमी सांभाळत असतात. वृद्धांना केवळ दया, उपकार, मदत यापेक्षा त्यांच्या कौशल्याचा वापर करणारी व्यवस्था निर्माण करणे हे महत्त्वाचे ठरते. यातून वृद्धांच्या केवळ उत्पन्नाचा नव्हे तर त्यांच्या वेळेचाही गुंतवणूक म्हणून उपयोग करता येऊ शकतो. वाढत्या डिजिटल तंत्रामुळे अनेक कुटुंबात एकटेपण वाढत असून त्यातून निर्माण होणारे नैराश्य कमी करण्यासाठी वृद्ध लोकसंख्या महत्त्वाचा आधार घटक ठरू शकतात. याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वित्झर्लंड या राष्ट्राने टाईम बँक ही संकल्पना राबवली आहे. स्वित्झर्लंडची टाईम बँक ही अत्यंत नाविन्यपूर्ण तसेच व्यावहारिकदृष्ट्या उपयुक्त ठरणारी आहे. यामध्ये ज्यांच्याकडे वेळ आहे कौशल्य आहे असे लोक ज्यांना सेवेची गरज आहे, मदतीची गरज आहे, त्यांना ती मदत देतात. उदाहरणार्थ एखादी व्यक्ती आजारी आहे किंवा अपघात झाला आहे तर तिला देखभालीसाठी मदतीची आवश्यकता असते, अशी मदत जे देऊ शकतात. ते आपल्या दिवसातील काही तास सेवा देतात. त्यांची ही सेवा टाईम बँकेमध्ये जमा होते. जसे आपले पैसे बँकेत जमा होतात तसे श्रम बँकेत जमा होतात. कालांतराने जर या व्यक्तीला मदतीची गरज असेल तर टाईम बँकेतून ही मदत तेवढ्या प्रमाणात उपलब्ध करून दिली जाते. वेळीच कर्जही उपलब्ध केले जाते. म्हणजे आपण केलेल्या बचतीच्या वेळेपेक्षा जास्त वेळ लागणार असेल तर आपण कर्जाऊ मदत घेऊ शकतो. यातून स्वावलंबन आणि आनंद दोन्ही एकत्रित प्राप्त होते. भारतात एकत्रित कुटुंब पद्धत आता मर्यादित प्रमाणात दिसत असून प्रत्येक व्यक्तीपुढे भविष्यकाळात वाढते आयुर्मान कशाप्रकारे सांभाळायचे हा मोठा प्रश्न आहे. त्यातही महिलांचा, एकल महिलांचा प्रश्न अधिक गंभीर आहे. केवळ काही तरतुदी आणि फुटकळ मदत यापेक्षा सर्वांना सन्मानाने उपलब्ध होणारी मदत आणि त्यासाठी आवश्यक यंत्रणा निर्माण करणे ही गरज वृद्धांची केरळ स्टोरी महत्त्वाची ठरते. केवळ पैसा असणाऱ्या मर्यादित लोकांचा विचार न करता सर्व लोकांना सन्मानाने आनंदाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हे मानवतेचे आव्हान स्वीकारण्याची सुरुवात केरळ आपल्या पहिल्या ज्येष्ठांच्या अर्थसंकल्पातून केली असे म्हणावे लागेल. इतरही राज्ये त्याचा स्वीकार करतील अशी अपेक्षा आपण ठेवणे योग्य ठरेल.

# खासगी क्षेत्रातही आता इलेक्ट्रिक बस!

## १० बसेस पुणे–मुंबई–पुणे मार्गावर धावणार

दैनिक आपला विदर्भ




**पुणे । प्रतिनिधी :** सध्या सर्वत्र डिझेल-पेट्रोलऐवजी इलेक्ट्रिक बस तसेच इलेक्ट्रिक दुचाकीला महत्त्व दिलं जातंय. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात तसेच पीएम पीएलच्या ताफ्यात इलेक्ट्रिक बस आल्यानंतर आता खासगी क्षेत्रात देखील इलेक्ट्रिक बस आली असून, खासगी बस सेवा पुरवणारी प्रसन्न पर्पल या बससेवा देणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून पुणे ते मुंबई मार्गावर १० बसेस चालवल्या जात असून, या १० बसेस पुणे-मुंबई-पुणे मार्गावर धावणार आहेत.

पुणे ते मुंबई मार्गावर सुरू करण्यात आलेल्या पहिल्या खासगी इलेक्ट्रिक बसचे लोकार्पण राज्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आलंय. १० इलेक्ट्रिक बसेस आजपासून प्रवाशांच्या सेवेमध्ये रुजू झाल्यात. या सर्व बसेस स्वीच मोबिलिटी या कंपनीच्या असून, पुणे-मुंबई-पुणे मार्गावर या इलेक्ट्रिक बसेस धावतील. या माध्यमातून खासगी बस सेवा देणारी प्रसन्न पर्पल ही पहिली संस्था ठरली आहे.

यावेळी प्रसन्न पटवर्धन म्हणाले की, आज आम्ही प्रवाशांसाठी १० इलेक्ट्रिक बस सुरू केल्यात. पेट्रोल-डिझेलबाबत आपण दुसऱ्या देशांवर अवलंबून असून, इलेक्ट्रिकबाबत आपण स्वयंभू आहोत. आमचं इलेक्ट्रिक मोबिलिटीकडे जाण्याचा प्लॅन होता आणि आता या १० बसेस सुरू करण्यात आल्यात, ज्या पुणे-मुंबई-पुणे धावणार आहेत. साडे तीनशे किलोमीटर या बसेस प्रवास करू शकतात आणि पुण्यात एकदा चार्जिंग केल्यावर प्रवाशांना घेऊन मुंबईला गेल्यावर तिथ चार्जिंग केली जाणार आहे.

आज आपले ६० टक्के परकीय चलन हे पेट्रोल, डिझेल आणि पेट्रोलियम पदार्थ विकत घेण्यासाठी खर्च होत असताना इलेक्ट्रिक गतिशीलतेकडे वळणे ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने ही खासगी इलेक्ट्रिक बस सुविधा हे आम्ही उचललेले पहिले पाऊल आहे. आज ऊर्जा पुरवठा बंद झाला तर शहरे, कारखाने आणि वाहतूक सुविधादेखील ठप्प होतात, यावर पर्याय शोधायचा असेल तर देशात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या इलेक्ट्रिसिटीचा वापर केला गेला पाहिजे. आज आपण केवळ ६५ टक्के इतकी वीज वापरत असून, आपली ३५ टक्के वीज वाया जाते, तिचा योग्य विनियोग करीत परकीय चलन वाचवायला हवे आहे. देशात इलेक्ट्रिक मोबिलिटी आणायची असेल तर वाहनांची उपलब्धता, त्यासाठी आर्थिक मदत, आवश्यक पायाभूत सुविधा सरकारने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही यावेळी त्यांनी केली.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या की, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बदलण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे अनेक गोष्टींची अंमलबजावणी करीत असून, यामध्ये सार्वजनिक वाहतूक गाड्यांची खरेदी आणि पायाभूत सोयी सुविधांच्या उभारणीसाठी सबसिडी उपलब्ध करून देणे, वाहतुकीसाठी सरकारी खर्चाने पायाभूत सोयीसुविधा उभारण्यावर भर देणे यांचा समावेश आहेच. शिवाय खासगी संस्थांच्या मदतीने वाहतूक सुविधांचे पीपीपी तत्त्वावर एकीकरण करणे यांचाही समावेश असल्याचे मिसाळ यांनी यावेळी सांगितले.

राज्य सरकारने तीन हजार इलेक्ट्रिक बसेसची खरेदी करण्याचे निश्चित केलंय. त्यामध्ये दीड हजार बसेस या मुंबईसाठी आणि एक हजार बसेस या पुण्यासाठी खरेदी करण्यात येणार आहेत. मार्च महिन्यापर्यंत सरकारला ८०० बसेस मिळणार होत्या. मात्र, फक्त ४५० बसेसच मिळू शकल्या असून, त्याच्या निर्मिती प्रक्रियेला विलंब लागत आहे. इलेक्ट्रिक बसेसचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांनी त्या वेळेत उपलब्ध करून दिल्या तर आपल्याला त्याचा फायदाच होणार आहे. मात्र, प्रत्यक्षात तसे होत नाही. वाहतूक व्यवस्थेचे जाळे सक्षम करण्यासाठी सरकारकडून नियोजन सुरू आहे.

सरकारचा खासगी क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला असून, पीपीपी तत्त्वावर सुरू करण्यात येत असलेल्या मेट्रो सारख्या योजना यशस्वी होत आहेत. इलेक्ट्रिक वाहनांच्या बाबतीत देखील पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिपसारखे मॉडेल राबवणे सरकारला शक्य होईल का? याचा विचार करण्याची गरज आहे.'' पुण्यामध्ये वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी पाताळलोक हा १४ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प सरकार राबवणार आहे. नागरिकांनी मानसिकतेमध्ये बदल करून सार्वजनिक वाहतूक वापरण्यास प्राधान्य देण्याची गरज असल्याचं यावेळी त्यांनी सांगितलंय.

## सातपुडा जंगलात वाघाने एका आदिवासी व्यक्तीला जिवंत खाल्ले; मोहफुलांच्या मोहापायी पीडित व्यक्तीने गाठले होते 'कोअर झोन'

नर्मदापुरम : मध्य प्रदेशातील सातपुडा व्याघ्र प्रकल्पातून एक हृदयद्रावक घटना समोर आलीय. या प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रात मोहफुले गोळा करण्यासाठी गेलेल्या एका गावकऱ्यावर भुकेल्या असलेल्या वाघाने हल्ला केलाय. वाघाने त्या व्यक्तीला नखांनी आणि दातांनी लचके तोडत ठार केले आणि त्यानंतर त्याला जिवंतच खाऊन टाकले. वाघाने सुधाराज चौहान (वय ४९) यांचा बळी घेतला आणि त्यांच्या संपूर्ण शरीराची अत्यंत विद्रूप अवस्था केली; त्यानंतर जंगलात त्याचा धडावेगळं झालेलं शिर आणि शरीराचा उर्वरित भाग आढळून आला. घटनास्थळाच्या परिसरात रक्ताचे डाग आणि मानवी हाडे विखुरलेली आढळली.

**रात्रभर बेपत्ता; पहाटे जंगलात आढळले मृतदेहाचे विद्रूप अवशेष :** मृत व्यक्तीचे भाऊ रघुवर चौहान यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी सुधाराज हा मोहफुले गोळा करण्यासाठी तावा नदी ओलांडून सातपुडा व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रात गेले होते. सायंकाळपर्यंत तो घरी परतला नाही, तेव्हा गुरुवारी सकाळी त्यांच्या कुटुंबीयांनी जंगलाच्या दिशेने शोधमोहीम सुरू केली. थोड्याच अंतरावर शोध घेतल्यावर त्यांना प्रचंड धडकी भरली; कारण अवघ्या काही अंतरावरच सुधाराजचा मृतदेह पडलेला होता आणि वाघ अगदी त्याच्या शेजारीच बसून होता. गावकऱ्यांनी हिंमत एकवटली, मोठा आरडाओरडा केला आणि वाघाला तिथून पळवून लावण्यात यश मिळवले. मात्र, वाघ निघून गेल्यावर तिथे जे दृश्य उरले होते, ते त्याहूनही अधिक भयानक आणि विदारक होते.

**पोलीस आणि वनविभागाच्या पथकांनी मृतदेहाचे अवशेष ताब्यात घेतले :** गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे, केसला पोलीस ठाण्याचे पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्याच वेळी तपास करण्यासाठी वनविभागाचे एक पथकही तिथे पोहोचले. घटनास्थळाच्या परिसरात मृत व्यक्तीचे तुकडे आणि शरीराचे विविध अवशेष विखुरलेले आढळले. यावरून वाघ अत्यंत भुकेला होता आणि याच तीव्र भुकेमुळे त्याने सुधाराजला आपले भक्ष्य बनवले हे स्पष्ट झाले. मृतदेहाजवळच पडलेले आधार कार्ड मिळाल्यामुळे पीडित व्यक्तीची ओळख पटली. पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी (एण्ध) मदन लाल पवार यांनी सांगितले, ''हा हल्ला दुपारच्या सुमारास झाला असावा असे दिसते; पीडित व्यक्तीचे शीर (चेहरा) काळे पडले होते. मृत व्यक्तीची ओळख सुधाराज (पिता हजारी चौहान, रा. चनागढ झुंकर) अशी पटली आहे. शवविच्छेदन पूर्ण झाल्यानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला असून, त्यांनी त्यानंतर मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार केलेत.''

# सामाजिक क्रांतीचे दीपस्तंभ : महात्मा जोतीराव फुले

भारताच्या सामाजिक इतिहासात ११ एप्रिल हा दिवस केवळ एका महापुरुषाच्या जन्माचा दिवस नाही, तर समता, शिक्षण आणि मानवतेच्या नव्या युगाची सुरूवात करणारा दिवस आहे.महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांच्या जन्मामुळे भारतीय समाजव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. सन १८२७ मध्ये जन्मलेल्या या युगपुरुषाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाच्या प्रत्येक स्तरावर जाणवतो. ११ एप्रिल पासून महात्मा ज्योतिबा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात द्विशताब्दी जयंती समिती स्थापन केली आहे.समाजातील समता, शिक्षण, स्त्री-सक्षमीकरणांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचा राज्य सरकारने संकल्प केला आहे. त्यामुळे ११ एप्रिलचा दिवस भारताच्या सामाजिक समतेच्या तेजस्वी द्विशताब्दी पर्वाचा दिवस म्हणूनही देशात साजरा होत आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचा पुनर्विचार करणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून वर्तमानाला दिशा देण्याचे कार्य आहे.



### मानवतेचा धर्म : समतेचा मूलाधार

महात्मा फुले यांच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू म्हणजे ''मानव हा सर्वात मोठा धर्म आहे'' ही भूमिका. त्यांनी धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीचा विचार मांडला. त्यांच्या लेखनात आणि कृतीतून सतत दिसून येते की, समाजातील अन्याय आणि विषमता दूर केल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही. त्यांनी मांडलेली समतेची संकल्पना ही केवळ तात्त्विक नव्हती, तर ती प्रत्यक्ष कृतीतून साकारलेली होती.

### शिक्षणाची ज्योत : अज्ञानातून मुक्तीचा मार्ग

महात्मा फुले यांनी घेतलेला सर्वात क्रांतिकारी निर्णय म्हणजे शिक्षणाचा प्रसार. त्यांनी प्रथम स्वतः च्या पत्नीला सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले आणि त्यानंतर १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाईंनीही समाजाच्या विरोधाला न जुमानता स्वतःला शिक्षणासाठी वाहून घेतले. शेण गोट्याचा मार सहन करत सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. जोतीबा आणि सावित्री या दांपत्याच्या त्या काळातील सामाजिक बंडामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली.त्या काळात स्त्रीशिक्षणाला तीव्र विरोध असतानाही त्यांनी मागे हटणे स्वीकारले नाही. शिक्षण हेच शोषणाविरुद्धचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे, ही त्यांची धारणा होती. या कार्यातून त्यांनी समाजातील अज्ञानाची बेडी तोडण्याचा प्रयत्न केला.अविद्या हेच शोषणाचे मुख्य कारण आहे हे सांगताना त्यांनी समाजाला याबाबतचा कठोर संदेश दिला...

**विद्येविना मती गेली**
**मतीविना नीती गेली**
**नितीविना गती गेली**
**गती विना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले...**

### अन्यायाविरुद्ध बंड

त्या काळातील समाज रुढी-परंपरांच्या कठोर बंधनात अडकलेला होता. बालविवाह, सतीप्रथा, स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता यांसारख्या प्रथांनी समाजाला जखडून ठेवले होते. महात्मा फुले यांनी या सर्व प्रथांविरुद्ध उघडपणे आवाज उठवला. त्यांनी विधवांसाठी आश्रयस्थळे उभारली, विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या कृतीतून समाजातील महिलांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.

### सत्यशोधकांचा मार्ग : समतेची संघटित चळवळ

सन १८७३ मध्ये त्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा भारतीय सामाजिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी जातीभेद,अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध संघटित लढा उभारला. सत्यशोधक समाजाने समाजाला विचार करण्याची नवी दिशा दिली. ज्यामध्ये सत्य, समता आणि बंधुता यांना केंद्रस्थानी ठेवले आहे.सत्यशोधक समाजाच्या मार्फत त्यांनी एक समांतर विज्ञानवादी भूमिका समाजापुढे मांडली.तत्कालीन ब्राह्मण्यवादाला झुगारून नव्या चालीरीती समाजाला दिल्या.

### शेतकऱ्यांचा आवाज : अन्यायाविरुद्धचा प्रहार

महात्मा फुले यांनी केवळ सामाजिकच नव्हे, तर आर्थिक विषमतेवरही भाष्य केले. त्यांच्या ''शेतकऱ्यांचा आसूड'' या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे अत्यंत वास्तव चित्रण केले आहे. महसूल व्यवस्थेतील अन्याय, सावकारशाहीचे शोषण आणि प्रशासनातील दुर्लक्ष यावर त्यांनी कठोर टीका केली. शेतकरी हा समाजाचा कणा असूनही त्याचे जीवन दारिद्र्यात का अडकले आहे, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला.

### लेखनातून घडवलेले परिवर्तन

महात्मा फुले हे केवळ कृतीशील समाजसुधारक नव्हते, तर प्रभावी लेखकही होते. ''गुलामगिरी'' या ग्रंथातून त्यांनी जातीव्यवस्थेवर प्रखर प्रहार केला, तर ''सार्वजनिक सत्यधर्म'' मधून मानवतावादी धर्माची संकल्पना मांडली. त्यांच्या लेखनातून समाजाच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे कार्य झाले. यातून त्यांच्या विचारांची व्यापकता स्पष्ट होते.याशिवाय त्यांनी गुलामगिरी,शेतकऱ्यांचा आसूड,ब्राह्मणांचे कसब, तृतीय रत्न,सार्वजनिक सत्य धर्म,छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडा लिहून शिवरायांच्या कार्यकर्तुत्वाची ओळख करून दिली.रायगडावरील छत्रपती शिवरायांच्या समाधीची स्वच्छता केली. शिवाजी महाराजांच्या स्मृती पुनरुज्जीवनाच्या प्रारंभीच्या प्रयत्नांपैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व त्यांना मानले जाते.

### सार्वजनिक जीवनातील योगदान

महात्मा फुले यांनी सार्वजनिक जीवनातही सक्रिय सहभाग घेतला. पुणे महानगरपालिकेच्या कार्यातून त्यांनी नागरी प्रश्नांवर काम केले. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांनी ब्रिटिश प्रशासनाशी संवाद साधून सामाजिक प्रश्न मांडले आणि वंचित घटकांसाठी न्यायाची मागणी केली. शासन कोणतेही असो, ते न्याय्य आणि लोकहितकारी असले पाहिजे, ही त्यांची भूमिका होती.हंटर शिक्षण आयोगाकडे त्यांनी निवेदन सादर केले.सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला.

### सामाजिक सुधारणा स्वीकारल्या

इंग्रजांच्या काही सामाजिक सुधारणांना स्वीकारताना त्यांनी इंग्रजांच्या अन्यायकारक नीतीवर सडकून टीका केली. एवढेच काय इंग्रजांना समजेल अशा भाषेत त्यांनी त्याची उत्तरे दिली. कोणताही पहिला प्रयोग स्वतःच्या घरी, स्वतःच्या कुटुंबावर करून बोले तैसा चाले ,त्याची वंदावी पाऊले, असा आदर्श त्यांनी समाजामध्ये निर्माण केला आहे. स्वतः च्या पत्नीला शिकवले. स्वतःची विहिर मागास वर्गीयांसाठी खुली केली. ब्राह्मण्यवादाचा आयुष्यभर विरोध करुनही त्यांनी एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला.त्या मुलाचे आंतरजातीय लग्न लावून देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. महात्मा जोतीबा फुले यांनी घेतलेले निर्णय अशा प्रकारे कायम प्रेरणादायी आहेत. महात्मा ज्योतिबा फुले हे स्वतःच्या मुलाचा आंतरजातीय विवाह करणारे पहिले पालक ठरले आहेत. काळाची पावले ओळखून नवनव्या प्रयोगाद्वारे सामाजिक सुधारणा करण्यात भारतातल्या सर्व सामाजिक सुधारणा करणाऱ्या थोर पुरुषांमध्ये त्यामुळे महात्मा जोतीबा फुले वेगळे ठरले आहेत.

### यशस्वी व्यावसायिक

सामाजिक कार्य, संघटना सुरु ठेवण्यासाठी आर्थिक स्त्रोत मजबूत असणे आवश्यक असते. त्यासाठी अंगी व्यावसायिक कसब बाळगणे खूप गरजेचे असते. संघटना, चळवळी, सुधारणांचा डोलारा चालविण्यासाठी पैशाची गरज असते. त्यासाठी आदर्श पद्धतीने व्यवसाय करुन स्वयंपूर्ण होणे गरजेचे असल्याचे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सोदाहरणासह मांडून ठेवले. त्यांनी कंत्राटदार म्हणून अतिशय उत्तमपणे काम केले. आजही त्यांच्या सहभागात तयार झालेल्या वास्तू प्रेरक आहेत. पूल, धरणे, कालवे या बांधकामात कंत्राटदार म्हणून त्यांनी काम केले.

### आजच्या काळातील प्रासंगिकता

महात्मा जोतीबा फुले यांच्या कार्याला दीडशे वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही तितकीच आहे. शिक्षणातील विषमता, सामाजिक भेदभाव आणि स्त्रीसमानतेचे प्रश्न अद्यापही पूर्णतः संपलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार आणि आचरण करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असलेली दृष्टी मिळते.

### जोतीराव परिवर्तनाची अखंड प्रेरणा

महात्मा ज्योतिराव फुले हे एक व्यक्तिमत्त्व नसून एक चळवळ, एक विचारधारा आणि एक प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या कार्यातून राजर्षि छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रेरणा घेतली.त्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्राला फुलेशाहूआंबेडकरांचा महाराष्ट्र ही ओळख प्राप्त झाली आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करणे म्हणजे केवळ आदर व्यक्त करणे नव्हे, तर त्या मूल्यांना आपल्या जीवनात रुजवण्याचा संकल्प करणे होय.

महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात विशेष समिती स्थापन केली असून वर्षभर महात्मा जोतीबा फुले यांच्या जीवनकार्याला साजेशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करून सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरणार आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राज्यात वर्षभर उपक्रम

## शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या पुढाकारातून शालेय शिक्षण विभागाचा व्यापक आराखडा जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त सन २०२७ हे द्विशताब्दी वर्ष राज्यात उत्साहात साजरे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागामार्फत ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या कालावधीत राज्यातील सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्याचा व्यापक कृती आराखडा जाहीर करण्यात आला आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी नुकतेच एक पत्र लिहून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या अंतर्गतच्या उपक्रमांबाबत अवगत केले.

महात्मा फुले हे आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, थोर समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांनी जातीय विषमता, अंधश्रद्धा आणि शिक्षणावरील बंधने याविरुद्ध लढा देत सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समता, सामाजिक न्याय आणि मानवी मुक्तीचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवला. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या फुले दांपत्याने शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले.

या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने फुले यांच्या जयंती द्विशताब्दी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित, समावेशक आणि कौशल्याधारित शिक्षणाची जाणीव निर्माण करण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. ११ एप्रिल २०२६ रोजी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून या उपक्रमांची सुरुवात होणार आहे.

**व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्रांचे आयोजन**

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजवण्यासाठी महात्मा फुले यांच्या कार्यावरील पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार असून शाळांमध्ये वाचनालये ज्ञानकेंद्र म्हणून विकसित केली जाणार आहेत. तसेच त्यांच्या विचारांवर आधारित व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. स्त्री शिक्षण, सामाजिक न्याय आणि समतेच्या विचारांचा प्रसार करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

शालेयस्तरावर पथनाट्य, एकपात्री नाटके, समता दौड, ग्रामभेट, पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, विज्ञान उपक्रम, आयसीटी आधारित उपक्रम अशा विविध स्पर्धा व कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. 'महात्मा फुले शैक्षणिक प्रेरणा सप्ताह' साजरा करून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचा प्रयत्न होणार आहे. याशिवाय,



२०० या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी साजऱ्या केलेल्या उपक्रमांचे फोटो, व्हिडिओ आणि साहित्य ऑनलाइन अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत या सर्व कृती कार्यक्रमांचे आयोजन शाळांसाठी अनिवार्य राहणार असून विद्यार्थ्यांचा सहभाग ऐच्छिक असेल.

महिनानिहाय आखलेल्या कृती आराखड्यानुसार एप्रिलमध्ये जनजागृती, जूनमध्ये पर्यावरण व जलसंवर्धन, जुलैमध्ये सामाजिक समता, ऑगस्टमध्ये समाजसेवा, सप्टेंबरमध्ये नवोपक्रम, ऑक्टोबरमध्ये स्त्री सक्षमीकरण, नोव्हेंबरमध्ये नेतृत्व व नागरिकत्व, डिसेंबरमध्ये सांस्कृतिक विकास, जानेवारीत संशोधन प्रकल्प, फेब्रुवारीत विविध स्पर्धा आणि मार्च २०२७ मध्ये समारोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी शिक्षण आयुक्तांकडून दरमहा आढावा घेतला जाणार असून संबंधित यंत्रणांना नियोजन व नियंत्रणाची जबाबदारी देण्यात आली आहे.

महात्मा फुले यांची २०० वी जयंती ही केवळ उत्सव नसून सामाजिक परिवर्तनाची संधी आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करत विद्यार्थ्यांमध्ये समता, शिक्षण आणि मानवता या मूल्यांची रुजवण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी यानिमित्ताने केले आहे.

# बाह्ययंत्रणेद्वारे २ हजार ८४३ पदे; अंगणवाडी सेविका व मदतनीस २ लाख २१ हजार ३२८ पदास मंजुरी

## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महिला व बाल विकास विभागात तब्बल २३ वर्षांनंतर ८ हजार ६६९ नियमित पदे भरण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे विभागाच्या सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

**महिला व बाल विकास विभागाचा मोठा निर्णय; तब्बल २३ वर्षांनंतर नियमित ८ हजार ६६९ पदांच्या आकृतीबंधास मंजुरी**

विभागातील एकूण पदांचा आढावा घेण्यात आला. त्यापैकी काही पदे निरसित (रद्द) करून १६५ नव्या पदांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे विभागासाठी एकूण ८ हजार ६६९ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत.

याशिवाय, विभागाच्या कामकाजासाठी २ हजार ८४३ पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी सेविका व १,१०,६६४ अंगणवाडी मदतनीस, अशी एकूण २ लाख २१ हजार ३२८ मानधनाधारित पदे देखील मंजूर करण्यात आली आहेत.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, २३ वर्षांनंतर घेतलेला हा महत्त्वपूर्ण निर्णय विभागाच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यामुळे महिला व बालकल्याण योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल.




# पाण्याच्या शोधात आलेला बिबट्या विहिरीत पडला; ग्रामस्थांच्या प्रसंगावधानामुळे वाचला जीव पण दोन तासांनी जीव सोडला

दैनिक आपला विदर्भ

**पाचोरा । प्रतिनिधी :** पाचोरा तालुक्यातील आंबे वडगाव परिसरात आज एक थरारक घटना घडली. पाण्याच्या शोधात आलेला बिबट्या वडगाव जोगे शिवारातील शेतातील विहिरीत पडल्याची घटना समोर आली असून ग्रामस्थांच्या प्रसंगावधानामुळे त्या बिबट्याला अक्षरशः जीवदान मिळाले.पण दोन तासांनी जीव सोडला असल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव जोगे शिवारातील दिलीप काशिनाथ पवार यांच्या शेतातील विहिरीत आज बिबट्या पडलेला आढळून आला. परिसरात बिबट्या दिसल्याची माहिती मिळताच आंबे



वडगावचे सरपंच बबलू तडवी, ॲम्बुलन्स चालक तसेच वडगाव जोगे येथील अनेक ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

विहिरीत पडलेला बिबट्या पाण्यात तग धरून राहण्याचा प्रयत्न करत होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून ग्रामस्थांनी तात्काळ पुढाकार घेत विहिरीतील पाणी मोटारद्वारे उपसण्यास सुरुवात केली, जेणेकरून बिबट्याला बुडण्यापासून वाचवता येईल. ग्रामस्थांच्या या तत्परतेमुळे बिबट्या काही काळ सुरक्षित राहू शकला.पण दोन तासांनी जीव सोडला असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, या घटनेची माहिती तातडीने पाचोरा वनविभागाला देण्यात आली असून वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले आहेत.

या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले असले तरी ग्रामस्थांनी दाखवलेल्या धाडस व प्रसंगावधानामुळे एका वन्यप्राण्याचा जीव वाचण्याची आशा निर्माण झाली होती मात्र यावेळी अपयश आले आहे. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, उन्हाळ्याच्या वाढत्या तीव्रतेमुळे वन्यप्राणी पाण्याच्या शोधात मानवी वस्त्यांकडे वळत असल्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांनी सतर्क राहण्याची गरज असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे.

## होर्मुजमधील इराणच्या कर वसुलीवरून ट्रम्प यांनी व्यक्त केली नाराजी

वॉशिंग्टन/ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणकडून होर्मुज जलडमरूमध्य मार्गे होणाऱ्या तेल वाहतुकीत अडथळे निर्माण केल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, या प्रकरणात इराण अतिशय वाईट काम करत आहे आणि हे वर्तन अशोभनीय आहे.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी सोशल मीडियावर लिहिले, ''इराण होर्मुज जलडमरूमधून तेल जाऊ देण्याच्या बाबतीत अतिशय वाईट काम करत आहे. काही लोक याला अशोभनीय म्हणतील. हा तो करार नाही जो आपण केला होता.'' डोनाल्ड ट्रम्प यांची ही टिप्पणी तेल टँकरांकडून शुल्क आकारल्याच्या बातम्या समोर आल्यानंतर आली आहे. यापूर्वीही त्यांनी ट्विट करून म्हटले होते की, इराण होर्मुज जलडमरूमधून जाणाऱ्या टँकरांकडून शुल्क घेत असल्याच्या बातम्या आहेत. त्यांनी स्पष्ट केले, ''त्यांनी असे करू नये आणि जर करत असतील, तर त्वरित थांबवावे.''

व्हाईट हाऊस ने सांगितले की, युद्धविराम कराराचा एक भाग म्हणून होर्मुज जलडमरूम पुन्हा सुरू करण्याला त्यांचा पाठिंबा आहे. मात्र, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प इराणच्या लष्करी दलाचा विरोध करतात, कारण ते अजूनही या जलमार्गावर नियंत्रण ठेवून जाणाऱ्या जहाजांकडून टोल वसूल करून महसूल वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत.

युद्धविरामाची घोषणा करत दोन्ही देश विजयाचा दावा करत असले, तरी इराण आणि अमेरिका एकमेकांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. इराणच्या अर्ध-सरकारी वृत्तसंस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणी सैन्याने होर्मुज जलडमरूमध्ये बारूदी सुरंग (माइन्स) पेरल्या आहेत. हा मार्ग जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, तेहरानने तो बंद केल्याचे सांगितले जाते. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इशारा दिला आहे की, इराणने कराराचे पालन केले नाही, तर अमेरिकन सैन्य यापूर्वीपेक्षा अधिक कठोर कारवाई करेल.

# शासकीय कामांची तब्बल ९०० कोटींची बिलं थकीत; कोल्हापुरात कंत्राटदार आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर । प्रतिनिधी :** सरकारने कंत्राटदारांची थकीत बिलं तातडीने द्यावीत, अन्यथा राज्यातील राज्यकर्त्यांना कंत्राटदारांचा तळतळाट लागेल, असा इशारा कंत्राटदारांनी दिला आहे.

१५ एप्रिलपर्यंत सरकारने थकीत बिलांबाबत निर्णय घ्यावा, अन्यथा आमदार, खासदारांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

याशिवाय, सामूहिक आत्महत्या करण्याचा इशाराही कंत्राटदारांनी दिला आहे.

कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील कंत्राटदारांची शासकीय कामांची सुमारे ९०० कोटी रुपयांची बिलं थकीत आहेत. मात्र, शासनाकडून नवीन कामांची टेंडर प्रक्रिया सुरूच आहे.

याच्या निषेधार्थ आज कोल्हापुरात कंत्राटदार आक्रमक झाले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता तुषार बुरुड यांच्या कार्यालयात कंत्राटदारांनी ठिय्या आंदोलन केले. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करत कंत्राटदारांनी तीव्र संताप व्यक्त केला.

दरम्यान, थकीत बिलं दिल्याशिवाय नवीन टेंडर प्रक्रिया राबवू नये, तसेच १५ एप्रिलपर्यंत बिलं देण्याचा निर्णय घ्यावा, अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा कंत्राटदारांनी दिला आहे.

याबाबतचे निवेदन कंत्राटदारांनी अधीक्षक




अभियंता तुषार बुरुड यांना दिले आहे.


## महत्त्वाचे...

### कोल्ड्रिंकच्या टिनमध्ये अडकलेल्या नागाला सर्पमित्रांकडून जीवदान



दैनिक आपला विदर्भ


**मुंबई । प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील पोयंजे येथे आज सकाळी एका धक्कादायक घटनेत कोल्ड्रिंकच्या टिनमध्ये नाग शिरल्याचा प्रकार समोर आला. टिनमध्ये अडकल्याने साप बाहेर येऊ शकत नव्हता.



घराशेजारी फेरफटका मारत असताना मयूर मुंडे यांना कोल्ड्रिंकच्या डब्यात सापाचा डोका दिसला. त्यांनी तत्काळ सर्पमित्रांना माहिती दिली. माहिती मिळताच सर्पमित्र प्रतिक शेंद्रे आणि सहकारी अक्षय लबडे घटनास्थळी दाखल झाले.

सुमारे अर्धा तासाच्या प्रयत्नांनंतर नागाला कोणतीही इजा न होता सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. त्यानंतर या सापाला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.या घटनेनंतर सर्पमित्रांनी नागरिकांना साप दिसल्यास घाबरून न जाता तातडीने तज्ज्ञांची मदत घेण्याचे आवाहन केले. तसेच साप हे पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असून त्यांना मारू नये, असेही त्यांनी सांगितले.

### मुकेश अंबानींचा मुलगा अनंत अंबानीला सिनेसृष्टीतील स्टार्सनं दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा...



हैदराबाद : देशातील सर्वात श्रीमंत उद्योगपतींपैकी एक असलेल्या मुकेश अंबानींचा मुलगा, अनंत अंबानी, आज, १० एप्रिल रोजी आपला ३१वा वाढदिवस साजरा करत आहे. या विशेष प्रसंगी भारत आणि परदेशातील प्रसिद्ध सेलिब्रिटी सोशल मीडियावर अनंतबरोबरचे फोटो शेअर करून त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आहेत. शाहरुख खानपासून ते सलमान खानपर्यंत सर्वांनी अनंतवर प्रेमाचा वर्षाव केला आहे. शाहरूख खान : अभिनेता शाहरूख खाननं आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर अनंतला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि लिहिलं, ''अनंत अंबानीला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा... तुम्ही असेच चांगले काम करत राहा आणि सकारात्मकता आणि सत्यता टिकवून ठेवा. तुमच्या कामातून लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवत राहा. देव तुम्हाला नेहमी निरोगी आणि आनंदी ठेवेल. '

सलमान खान : हिंदी चित्रपटसृष्टीचा दबंग सलमान खाननं आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर अनंतसोबतचे फोटो शेअर करत त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत लिहिलं, 'हे ऐका, तुमची स्मरणशक्ती कमकुवत असेल तर लिहून ठेवा... हा माणूस देशालाही वर उचलेल... माझा धाकटा भाऊ अनंत दीर्घायु होवो... मनाने आणि हृदयानं अंबानी, अनंत, निमळ आत्मा.'

संजय दत्त : हिंदी चित्रपटसृष्टीचा 'संजूबाबा' अर्थात संजय दत्तचं अनंत अंबानीबरोबर मैत्रीचं एक खास नाते आहे. संजय दत्तनं त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर अनंतला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि त्याच्यासोबतचा स्वत:चा एक फोटोही शेअर केला. आपल्या पोस्टवर अभिनेत्यानं लिहिलं, 'अनंत, माझ्या भावा, तू सर्वात दयाळू आणि प्रेमळ भाऊ आहेस. मी भगवान शिवाकडे प्रार्थना करतो की, तू निरोगी रहा आणि तुझ्या सर्व प्रयत्नांमध्ये यशस्वी हो. नेहमी आनंदी राहा आणि माझ्यासाठी जसा प्रेमळ भाऊ आहेस तसाच राहा. वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, देव तुझे भले करो! हर हर महादेव.'

रणवीर सिंग : 'धुरंधर २' स्टार रणवीर सिंगनं अनंत अंबानींच्या जवळच्या मित्रांपैकी एक आहे. अभिनेत्यानं त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीवर त्यांच्यासोबतचा एक फोटो शेअर करून त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

वृत्तविशेष...

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात ८०० मेगावॉटचा नवा संच; कोळशाची बचत अनब वीज उत्पादन वाढणार

**चंद्रपूर । प्रतिनिधी :** महाऔष्णिक वीज केंद्रात ८०० मेगावॉटचा संच प्रस्तावित आहे. सुपर क्रिटीकल अथवा अल्ट्रा सुपर क्रिटीकल हा संच राहणार आहे. अशा तंत्रज्ञानातून विकसित केलेला हा राज्यातील एकमेव संच राहणार आहे. त्यामुळे यात कोळशाचा वापर कमी होणार आहे. तसेच २१० मेगावॉटच्या ३ व ४ क्रमांकाच्या संचाचे आयुष्यमान वाढविण्यासाठी 'आरएनएम' करण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती वीज केंद्राचे मुख्य अभियंता अनिल काथोये यांनी दिली.

महाऔष्णिक वीज केंद्राच्या मुख्य अभियंतापदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर काथोडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी २९२० मेगावॉट क्षमतेच्या चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात भविष्यातील प्रस्तावित योजनांची माहिती दिली. राज्यातील औष्णिक वीज केंद्राला म हाऔष्णिक शब्द लागणारे चंद्रपूर एकमेव वीज केंद्र आहे, असं ते म्हणाले.

पुढे बोलताना काथोडे म्हणाले, उन्हाळ्याच्या दिवसात राज्यात सर्वाधिक वीजेची मागणी याच केंद्राकडून होते आणि ही मागणी शंभर टक्के क्षम तेने आम्ही पूर्ण करतो. आज या वीज केंद्राची क्षमता २९२० मेगावॉट आहे. भविष्यात ८०० मेगावॉटचा नविन संच येथे प्रस्तावित आहे. हा संच अतिशय आधुनिक पध्दतीने विकसीत केला जाणार आहे. सुपर क्रिटीकल किंवा अल्ट्रा सुपर क्रिटीकल प्रणालीचा हा संच प्रस्तावित राहणार असून कोळशाचा कमी वापर होणार आहे. आज वीज केंद्रात ५ लाख मेट्रीक टन कोळसा उपलब्ध आहे. सध्या कोळशाची कुठलीही टंचाई नसली, तरी भविष्यासाठी कोळसा साठा अधिक वाढविण्याच्या दिशेने पावले उचलली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रदूषणाबाबत वीज केंद्राकडे बोट दाखवण्यात येत असले, तरी वीज केंद्रातून प्रदूषण होत नसल्याचे सांगतानाच इरई नदी खोलीकरणात वीज केंद्राची भूमिका महत्त्वाची असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी वीज केंद्राचे अधिकारी राजुरकर, अभियंता बनकर तथा इतर अधिकारी उपस्थित होते.

## फसवणुकीचा धोका कमी होणार ? लवकरच आरबीआय आणणार नवा नियम

**मुंबई । प्रतिनिधी :** देशभरातील ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेनं एक मोठा उपाय प्रस्तावित केला आहे. यामध्ये १०,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या डिजिटल पेमेंटसाठी एक तासाचा विलंब किंवा 'कूलिंग-ऑफ' कालावधी लागू करण्याची शिफारस केली गेली आहे.

वाढत्या ऑनलाईन पेमेंटच्या काळात डिजिटल फसवणुकीचे प्रमाणही वाढत आहेत. या घटनांना आळा घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेनं नवीन नियम प्रस्तावित केले असून ऑनलाइन पेमेंट अधिक सुरक्षित करणं आणि लोकांच्या पैशांचं फसवणुकीपासून संरक्षण करणं हा यामागचा उद्देश आहे. आरबीआयनं या सूचना एका चर्चापत्राच्या स्वरूपात प्रसिद्ध केल्या असून त्यावर ८ मे २०२६ पर्यंत जनता आणि तज्ञांकडून अभिप्राय मागवले आहेत.


ऑनलाइन पेमेंटचा वापर झपाट्यानं वाढत असतानाच फसवणुकीच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलनुसार, २०२५ मध्ये अंदाजे २२,९३१ कोटी रुपयांच्या तब्बल २८ लाख फसवणुकीच्या घटनांची नोंद झाली. त्यामुळे डिजिटल सुरक्षा म जबूत करण्याची तातडीची गरज स्पष्टपणे दिसून येते.


डिजिटल फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँक १०,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या डिजिटल व्यवहारांवर (ळझ्घ किंवा घ्झ्इएअकाउंट-टू-अकाउंट) एक तासापर्यतचा 'कूलिंग पीरियड' लागू केला जाऊ शकतो. म्हणजे एखाद्यानं नवीन खात्यात १०,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम हस्तांतरित केली, तर ती रक्कम त्वरित जमा होणार नाही तर त्यासाठी एक तास लागणार आहे.

१०,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या ट्रान्सफरसाठी एक तास विलंब होईल, आणि तोपर्यंत ग्राहक आपले व्यवहार रद्दही करू शकतात. यामुळे एखाद्याच्या लक्षात आलं की त्यांनी चुकून किंवा फसवणुकीनं पैसे पाठवले आहेत, तर एका निश्चित कालावधीत व्यवहार रद्द करता येतील. अशाप्रकारे, लोकांना फसवणुकीपासून वाचवण्यासाठी हे नवीन नियम उपयुक्त ठरू शकते.

त्याचवेळी, रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावानुसार ज्येष्ठ नागरिक म्हणजेच ७० पेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींसाठी ५०००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या हस्तांतरणासाठी विश्वासू व्यक्तीची परवानगी अनिवार्य असेल. तसेच वैयक्तिक आणि लहान व्यवसाय खात्यांमधील २.५ लाखांपेक्षा जास्त ठेवींसाठी बँक पडताळणीनंतरच निधी जमा केला जाईल.

# समृद्धीवर मृत्यूचा सापळा! मेहकरजवळ तिहेरी अपघात; मदतकर्तेही जखमी







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी :** समृद्धी महामार्गावर पुन्हा एकदा वेग आणि निष्काळजीपणाने जीवघेणा तांडव माजवला. मेहकरजवळ चॅनेल क्रमांक २९३ (मुंबई कॉरिडॉर) येथे शुक्रवारी सायंकाळी सुमारे ४ वाजता झालेल्या तिहेरी अपघातात २ जण गंभीर तर ५ जण किरकोळ जखमी झाले. धक्कादायक म्हणजे, मदतीसाठी धावून आलेले नागरिक आणि कर्तव्यावर असलेले जवानही या अपघातात जखमी झाले.

संगमनेर येथील शशांक कृष्णा खेरणार (२५) हे नेक्सा कारने मुंबईकडे जात असताना त्यांच्या वाहनाने समोरील अज्ञात वाहनाला जोरदार धडक दिली. या पहिल्याच धडकेत ते गंभीर जखमी झाले आणि रस्त्यावर अफरातफर उडाली. अपघातानंतर मदतकार्य सुरू असतानाच, पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या औरा कारने समोरील इनोव्हा कारला जोरदार धडक दिली.

या जबरदस्त धडकेने औरा आणि इनोव्हा दोन्ही गाड्या पुढे जाऊन नेक्सा कारवर आदळल्या आणि अपघाताचे स्वरूप अधिक भीषण झाले.

या दुसऱ्या धडकेत मदतीसाठी थांबलेले ट्रक चालक मोईजोद्दीन मोहम्मद शेख (रा. वसई) यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. तर एम एस एफ जवान आकाश मोहाडे, संतोष सोनुने, सचिन आंधळे आणि फायर ब्रिगेडचे जवान परमेश्वर शिंदे हे किरकोळ जखमी झाले. औरा कारमधील अमित बोंडे आणि तेजस वाघोरे यांनाही दुखापत झाली असून, चालक अक्षय चनाप (रा. बार्शी टाकळी) हा अपघातानंतर फरार झाल्याची माहिती आहे. इनोव्हा चालक निजाम खान वकील खान हे मात्र सुदैवाने बचावले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि आपत्कालीन पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सर्व जखमींना मेहकर ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. गंभीर जखमींपैकी एकास जालना तर दुसऱ्यास मुंबई येथे पुढील उपचारासाठी हलवण्यात आल्याची माहिती आहे. अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली असून, या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत. समृद्धी महामार्गावर वाढणाऱ्या अपघातांच्या घटनांनी पुन्हा एकदा सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## खाजगी नोकरी इच्छुकांसाठी सुवर्णसंधी; बुलढाण्यात १३ एप्रिलला प्लेसमेंट ड्राइव्ह

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी नोकरीची संधी उपलब्ध झाली असून, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा आणि मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राइव्ह'चे आयोजन करण्यात आले आहे.

ही प्लेसमेंट ड्राइव्ह सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदुरा, जि. बुलढाणा येथे आयोजित करण्यात आली आहे. या मेळाव्यात चिरायु पॉवर (खामगाव), क्रेडिट ॲक्सीस ग्रामीण (नांदुरा) आणि क्वीज कॉर्प (पुणे) यांसारख्या नामांकित कंपन्या सहभागी होणार असून विविध रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाद्वारे उमेदवारांच्या थेट मुलाखती घेऊन प्राथमिक निवड करण्यात येणार आहे. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी देखील उपलब्ध होणार आहे. दहावी, बारावी, आयटीआय तसेच पदवीधर पुरुष व महिला उमेदवारांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार एकापेक्षा अधिक पदांसाठी मुलाखत देण्याची संधी मिळणार आहे.

उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह दि. १३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदणी करावी व संबंधित कंपनी प्रतिनिधींसमवेत मुलाखत द्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा येथील दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२६४२ वर संपर्क साधावा.

## पुण्यात एफडीएची कारवाई; मावळमध्ये भेसळयुक्त आंबा पल्प जप्त

**पुणे । प्रतिनिधी :** उन्हाळ्यात नागरिकांना सुरक्षित अन्न मिळावे, यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या म ोहिमेदरम्यान मावळ तालुक्यातील एका ठिकाणी भेसळयुक्त आंबा पल्प तयार केल्याचा प्रकार उघडकीस आला. या कारवाईत एकूण २ लाख २३ हजार १९६ रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला.

गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने संबंधित उत्पादन युनिटवर छापा टाकला. तपासणीदरम्यान आंबा पल्प तयार करताना अधिकृत नसलेले रंग व इतर भेसळीचे घटक वापरले जात असल्याचे आढळून आले. या ठिकाणाहून आंबा पल्प, आंबा फळ तसेच साखर, गायीचे दूध आणि द्रव केशरी रंग अशा घटकांसह एकूण सहा नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. या ठिकाणी साठवून ठेवलेला ३,२८२.९ किलो इतका १ कोटी ६१ लाख ८१६ किंम तीचा माल जप्त केला. नाशवंत स्वरूप लक्षात घेऊन हा साठा नष्ट करण्यात आला.

## नाशिक आयटी कंपनी लैंगिक शोषण प्रकरणी पुण्यातून महिला मॅनेजर ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक प्रतिनिधी :** शहरातील नामांकित बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत महिलांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार तसेच एका युवकाचा धर्मांतराचा प्रयत्न केल्याच्या प्रकरणात नाशिक पोलिसांनी कंपनीच्या पुणे येथील म नुष्यबळ विभागातील संशयित महिला व्यवस्थापिकेकडे चौकशी केली. या महिलेकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करून कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे.

एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिलांचा विनयभंग, लैंगिक व म ानसिक अत्याचार, धार्मिक भावना दुखावणे आणि एका युवकाच्या धम ांतराचा प्रयत्न असे प्रकार उघड झाले. या प्रकरणी एकूण नऊ गुन्हे दाखल असून पोलिसांनी सहा संशयितांना अटक केली आहे. न्यायालयाने पाच संशयितांची पोलीस कोठडीत रवानगी केली. साधारणत: २०२२ ते २०२६ या कालावधीत हे गुन्हे घडले. यातील एक गुन्हा लग्नाचे अमिष दाखवून लैंगिक शोषणाचा तर एक गुन्हा धर्म परिवर्तनाच्या प्रयत्नाचा आहे. या गुन्ह्यांची व्याप्ती, गांभिर्य व



संवेदनशीलता लक्षात घेऊन सखोल तपास करण्यासाठी नाशिक पोलिसांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली. तक्रारदारांमध्ये आठ महिला तर एका युवकाचा समावेश आहे. या युवकाच्या धर्मातराचा प्रयत्न झाल्याचे समोर आले.

या प्रकरणातील दोन महिला फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. तक्रारदार महिलेने कंपनीत घडणाऱ्या गैरप्रकारांबाबत वरिष्ठांकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. परंतु, त्यांनी तक्रारींची दखल न घेता संशयितांच्या कृत्यास चिथावणी दिली. याच अनुषंगाने तपास पथकाने पुणे येथून कंपनीच्या मनुष्यबळ विकास विभागाच्या प्रमुख महिला व्यवस्थापकीला चौकशीसाठी ताब्यात घेतले. या संशयित महिलेकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करण्यात आला. भारतीय नागरिक न्याय संहिता कलम ांन्वये महिला संशयितास कायदेशीर नोटीस बजावण्यात आल्याची माहिती सहायक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांनी दिली.

दरम्यान, या गुन्ह्यांची व्याप्ती, गांभिर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन सखोल तपास करण्यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सहायक आयुक्त (गुन्हे) यांच्या अधिपत्याखाली विशेष तपास पथक अर्थात एसआयटीची स्थापना केली आहे. यापुढे अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी सर्व खासगी आस्थापनांनी आपल्या कार्यस्थळी म हिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक ती खबरदारी व प्रतिबंधात्मक उपायोजना कराव्यात. विनयभंग किंवा अत्याचारासंबंधी तक्रार असल्यास पोलीस आयुक्तांच्या व्हॉट्स ॲप ९९२३३२३३११ या क्रमांकावर संदेश पाठवू शकतात. किंवा नियंत्रण कक्षाशी ११२ या क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवू शकतात. तक्रारदार महिला, संस्था किंवा माहिती देणाऱ्या व्यक्तींची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महामार्ग पोलिसांनी मालवाहू ट्रक अडवला, चालकाने पैसे न दिल्याने पोलिसांनी चक्क ट्रक जाळला

### पंजाबमधील ट्रक मालकाच्या आरोपांनी खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**येवला । प्रतिनिधी :** येवला येथील पिंपळगाव जलाल टोल नाका येथे महाम ार्ग पोलिसांनी मालवाहू ट्रक अडवला. दरम्यान, दंड वसुलीच्या नावाने पाच हजार रुपयांची डिमांड केली आणि ती न दिल्याने पोलिसांमध्ये आणि ट्रक चालक यांच्यात वाद झाला. त्यांनतर हा वाद विकोपाला जाऊन चालकाला मारहाण करत त्याचा चक्क मालवाहू ट्रक पेटवून दिल्याचा आरोप पंजाबमधील ट्रक मालकाने केला आहे. या घटनेनंतर येवला येथील अग्निशमन बंबाद्वारे आज विझविण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र आग वाढतच गेल्याने गाडीतील बरेचसे सामानसह गाडी जळून खाक झाली.

दरम्यान, घटनास्थळी स्थानिक नागरिक जमा झाल्याने पोलिसांनी तेथून पळ काढल्याचा आरोपही चालकाने केला आहे. पंजाबमधील या मालवाहू ट्रकमध्ये पुणे येथून आर्मी जवानाचे साहित्य भटिंडा येथे वाहतूक केली जात असल्याचे समजते. अशातच म हामार्ग (हायवे ट्रॅप) पोलीस सातत्याने वाहनांना अडवून पैसे वसुली करत असल्याने सातत्याने वाहतूक कोंडी देखील होत असल्याचा आरोप देखील या चालकाने केला आहे. या घटनेची नेमकी सत्यता काय याबाबत पोलीस अधिक तपास करत आहे. मात्र या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाला आहे.

बीडच्या केज येथे शासकीय विश्राम गृहा समोर असलेले भाच्याचे हॉटेल मामानेच पेट्रोल ओतून पेटवून दिल्याची घटना घडलीय. यानंतर हॉटेल चालक तरूणाने बाजुच्या दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता त्याच्याच सख्या मामानेच पेट्रोल टाकून हॉटेल पेटवून दिल्याचे निदर्शनास आले. काही दिवसांपूर्वी बहिण भावाचा घरी किरकोळ वाद झाला होता. यानंतर मामाने रात्री भाच्याचे हॉटेल बंद झाल्यानंतर पेटवून दिले. यामध्ये लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे. याप्रकरणी केज पोलीसात मामा गोविंद कोंबडे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे जागतिक होमिओपॅथी दिवस उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** होमिओपॅथीचे जनक सर सॅम्युएल हॅनेमन यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, बुलढाणा जिल्हा रुग्णालय येथे जागतिक होमिओपॅथी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ''शाश्वत आरोग्यासाठी होमिओपॅथी'' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी तर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल राम गिते हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. दत्तात्रय बिराजदार म्हणाले की, केंद्रीय आयुष तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापरावजी जाधव यांच्या खंबीर नेतृत्वात जिल्ह्यात आयुष मंत्रालयामार्फत सामान्य नागरिकांसाठी अनेकविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. होमिओपॅथीसह आयुषच्या इतर सर्व चिकित्सा पद्धतींचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. भविष्यात जिल्ह्यात आयुष विभागामार्फत



येणाऱ्या विविध अद्ययावत सेवा-सुविधांची सविस्तर माहितीही त्यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमात डॉ. स्वाती धारस्कर यांनी होमिओपॅथी चिकित्सा पद्धतीचे मानवी आरोग्यावरील सकारात्मक परिणाम आणि या उपचार पद्धतीचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला जिल्हा आयुष अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण घोंगटे, अधिसेविका श्रीमती कुलकर्णी, आयुष सल्लागार डॉ. मोहम्मद शफाअत, वैद्यकीय अधिकारी डॉ. सय्यद अरषद, डॉ. शीतल ठाकरे, डॉ. कमर खान, औषध निर्माण अधिकारी रेखा भुसारी शिंदे यांच्यासह जिल्हा रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत तांगडे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. पंकज राठोड यांनी केले. उपस्थितांचे आभार वैभव उबरहंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शांता अंभोरे, सौरभ कुलकर्णी व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.